## महेश्वरी नगर रोड नं. १६, एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व) विभागातील पोलीस वसाहत येथील शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी दिनांक १३ फेब्रुवारी २०१५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्तांत

भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या दरम्यान संयूक्तपणे मेट्रो लाईन-३ (कुलाबा-बांद्रा- सिप्झ) हा ३३ कि. मी. लांबीचा संपूर्णतः भूयारी मार्ग असून या प्रकल्पात एकूण २७ स्थानके प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्प मेट्रो रेल कार्पोरेशन मर्या. कंपनीच्या माध्यमातून साकारण्यात येत आहे. सदर प्रकल्पास जपान इन्टरनॅशनल कोऑपरेशन एजन्सी (JICA) या कंपनीचे अर्थसहाय प्राप्त होणार आहे.

या प्रकल्पास भारत सरकारची मंजूरी प्राप्त झाली असून दिनांक १९ सप्टेंबर २०१३ रोजी मेट्रो-Act (Alignment) **अंतर्गत राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारने मेट्रो लाईन-३ प्रकल्प "महत्वपुर्ण सार्वजनिक प्रकल्प" आणि "महत्वाचा नागरी वाहतूक प्रकल्प" जाहिर केला आहे. या प्रकल्पांतर्गत** महेश्वरी नगर रोड नं. १६, एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व) विभागातील पोलीस वसाहत येथील शासकीय निवासस्थाने बाधित होत आहेत. सदर पोलीस वसाहतीमध्ये ५ इमारती असून त्यामध्ये १६ सदनिका अधिका-यांसाठी व ४८ सदनिका पोलीस अंमलदारासाठी असून वसाहतीच्या संकूलात १ पंप हाऊस आणि वसाहतीतील पोलीस अधिकारी व अंमलदार आणि त्यांची मुले यांच्यासाठी व्यायाम शाळा बांधण्यात आली आहे. मेट्रो लाईन-३ (कुलाबा-बांद्रा- सिप्झ) **अंतर्गत २७ स्थानकापैकी** MIDC हे २५ **व्या क्रमांकाचे स्थानक असून सदर स्थानकाकरीता पोलीस वसाहतीतील ९७ sq m. क्षेत्र कायम स्वरुपी व तात्पुरत्या स्वरुपातील ७८५ sq. m. क्षेत्र आवश्यक आहे.** सदर निवासस्थानामधील रहिवाशांना मेट्रो प्रकल्पाच्या बांधकाम काळात तात्पुरते स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी शिल्लक जागेत नविन निवासी इमारत बांधून त्या ठिकाणी सदर रहिवाशांना परत आणणे प्रस्तावीत आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने पोलीस वसाहतीतील शासकीय सदनिकेत वास्तव्यास असलेले पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांच्या समवेत दिनांक १३/२/२०१५, शुक्रवार रोजी ठिक सायं ६: वाजता सदर पोलीस वसाहतीच्या ठिकाणी बैठक आयेजित करुन चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीस मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन तसेच पोलीस विभागा तर्फे खालील अधिका-यांनी पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांना मार्गदर्शन केले.

१) श्री प्रशांत होळकर, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१०

२) श्री आर. रमण्णा, कार्यकारी संचालक, एमएमआरसी

३) श्री अनिल वानखडे उप महानगर आयुक्त, भूमि शाखा

४) श्री घनश्याम मंगळे, अपर जिल्हाधिकारी, एमएमआरसी (पु. व पु)

५) श्री प्रदिप सोनवणे, सहा. पोलीस आयुक्त अंधेरी (पुर्व) विभाग

६) श्री सी. एम. जाधव जन. मॅनेजर (डेपो)

७) श्रीमती संगीता वराडे तहसीलदार, एमएमआरसी

८) श्री संजय दाणी, डेप्युटी जन. मॅनेजर (सेक्युरीटी) एमएमआरसी

सर्व प्रथम श्री प्रदिप सोनवणे, सहा. पोलीस आयुक्त, अंधेरी (पुर्व) विभाग यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन सर्व उपस्थितीत अधिका-यांचा परिचय करुन दिला. तद्नंतर श्रीमती संगीता वराडे, तहसीलदार यांनी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन तर्फे पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांचे स्वागत करुन कार्यक्रमाच्या पुढील मार्गदर्शनासाठी श्री आर रमण्णा यांना विनंती केली. सदर विनंती नुसार श्री रमण्णा यांनी उपस्थित व्यक्तीना मेट्रो लाईन-३ प्रकल्पाबद्दल प्राथमिक स्वरुपाची माहिती दिली. तसेच MIDC स्थानकाकरीता लागणारी जागा व त्यासाठी करावे लागणारे तात्पुरते स्थलांतर याबाबत अवगत केले. मेट्रो-३ प्रकल्पा बाबत माहिती दर्शविणारी तसेच प्रकल्पाचे महत्व विषद करणारी चित्रफित उपस्थितांना दाखविण्यात आली.

सदर चर्चा सत्रात पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांनी उपस्थितीत केलेले मुद्दे व संबधित मुदयांच्या अनुषंगाने MMRC च्या अधिका-यांनी केलेले मार्गदर्शन खालीलप्रमाणे

| अ. क्र. | उपस्थितीत केलेले मुद्दे | अधिका-यांनी केलेले मार्गदर्शन |
|---|---|---|
| १ | एमएमआरसीकडून तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी सदनिका देण्याऐवजी कायम स्वरुपी मालकी हक्क स्वरुपात घरे मिळावी, सदर घरांसाठी आवश्यक असलेली रक्कम आम्ही भरण्यास तयार आहोत. | सदर निवासस्थाने ही गृह विभगानी पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी उपलब्ध करुन दिलेली शासकीय निवासस्थाने आहेत सद्यःपरिस्थितीत शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मालकी हक्क स्वरुपात घरे देणे बाबत कोणतेही शासन निर्णय, परिपत्रक, योजना अथवा धोरण नसल्यामुळे कायम स्वरुपाची घरे MMRC दृवारे देता येणार नाहीत परंतू सदर विषयाच्या अनुषांगाने मा. पोलीस आयुक्त यांच्या मार्फत शासनाकडे धोरणात्मक मागणीसाठी पाठपुरावा करणे योग्य होईल असे सांगितले. |
| २ | एमएमआरसीकडून तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी सदनिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, सदर सदनिकामध्ये नेहमीसाठी स्थायिक होता येईल का? | एमएमआरसीकडून तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी सदनिका उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, सदर सदनिकामध्ये नेहमीसाठी स्थायिक होता येणार नाही एमएमआरडीए / एमएमआरसीकडून पुर्वीच्या शासकीय जागेवर सदनिकांचे बांधकाम, प्रकल्प समाप्त होताच करण्यात येणार असून सध्य:स्थितीत असलेल्या शासकीय सदनिकेप्रमाणे वाटप करुन पुनश्चः स्थायिक केले जाईल. |
| ३ | पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांना स्थलांतरीत करताना येणारा खर्च व वाहतूक व्यवस्था एमएमआरडीए / एमएमआरसी कडून केली जाणार का? | पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांना स्थलांतरीत करताना येणारा खर्च व वाहतूक व्यवस्था एमएमआरडीए / एमएमआरसी कडून केली जाणार आहे. |
| ४ | पोलीस वसाहतीतील शासकीय सदनिकेत उपलब्ध असलेले पंखा, लाईट पर्यायी ठिकाणी उपलब्ध होणार का? | सदर सदनिका MMRC दृवारे पोलीस खात्याला तात्पुरत्या सदनिका उपलब्ध करुन देण्यात येणे बाबतची पोलीस वसाहतीतील शासकीय सदनिकेत उपलब्ध असलेले पंखा, लाईट पर्यायी ठिकाणी उपलब्ध करुन दिले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| ५ | पोलीस वसाहतीतील शासकीय सदनिकेत उपलब्ध मेटनन्सप्रमाणे मेंटनन्स उपलब्ध करुन दयावा. | सदर सदनिका MMRC द्वारे पोलीस खात्याला तात्पुरत्या कालावधीसाठी उपलब्ध करुन देण्यात येत असल्याने पोलीस वसाहतीतील शासकीय सदनिकेत उपलब्ध मेटनन्सप्रमाणे मेंटनन्स उपलब्ध करुन दिला जाणे अपेक्षित आहे. |
| ६ | पोलीस वसाहतीतील शासकीय सदनिकेत बरेच एकत्र कुटूंब राहतात. या सदनिकेपेक्षा अधिक क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात याव्यात. | पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार यांना शासकीय आदेशानुसार शासनाने वाटप केलेल्या क्षेत्राप्रमाणे पर्यायी सदनिका उपलब्ध करुन दिल्या जातील. |
| ७ | सदनिकेबाबत भरुन घेण्यात आलेल्या प्रश्नावली फॉर्म मधील माहिती केवळ आपल्या सोईसाठी घेण्यात आली किंवा कसे? | होय. सदनिकेबाबत भरुन घेण्यात आलेलेल्या प्रश्नावली फॉर्म मधील माहिती केवळ योग्य माहिती संकलनासाठी व सुयोग्य माहितीच्या आधारे पुढील निर्णय घेण्यासाठी आहे. |
| ८ | महेश्वरी नगर रोड नं. १६, एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व) विभगातील पोलीस वसाहत ऐवजी इतर पर्यायी ठिकाणी प्रकल्पासाठी जागा घेण्यात यावी. | महाराष्ट्र सरकारने मेट्रो लाईन-३ प्रकल्प "महत्वपुर्ण सार्वजनिक प्रकल्प" आणि "महत्वाचा नागरी वाहतूक प्रकल्प" जाहिर केला आहे. करीता सदर जागा प्रकल्पासाठी अत्यावश्यक आहे. सोयिस्कर अन्य पर्यायी जागा उपलब्ध नाही. |
| ९ | पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांना सार्वजनिक बांधकाम विभाग वा शासनाच्या इतर शासकीय सदनिकेत स्थलांतरीत केल्यास पुन:श्च बाधित कुटूंबांना स्थलांतरीत करण्याची आवश्यकता राहणार नाही. करीता सार्वजनिक बांधकाम विभाग वा शासनाच्या इतर शासकीय सदनिका उपलब्ध करुन देण्यात याव्या. | एमएमआरडीए / एमएमआरसी यांच्याकडून पर्यायी सदनिका पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांना सोईस्कर ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तथापि शासनाच्या अन्य सदनिका उपलब्ध असल्यास व तिथे स्थलांतरित होण्याची रहिवाशांची तयारी असल्यास पोलीस खात्याने त्याबाबत विचारकरण्यास हरकत नाही. |
| १० | गाडी पार्किगसाठी पार्किगव्यवस्था उपलब्ध आहे का? | स्थलांतरीत वसाहती मधील जागेच्या उपलब्धतेनुसार सुविधा देण्यात येईल. |
| ११ | २४ तास पाणी उपलब्ध होणार का? | महानगर पालिकेच्या नियमानुसार विहित पाणी पुरवठा उपलब्ध करुन दिला जाईल. |
| १२ | पोलीस वसाहतीत सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या व्यायाम शाळेसाठी जागा तसेच मोकळे मैदान, स्टेज मिळेल काय? | पर्यायी इमारतीत व्यायाम शाळेसाठी जागा उपलब्ध करुन दिली जाईल. तथापि मैदान, स्टेज इत्यादीबाबी देणे शक्य होणार नाही. |
| १३ | सदर विषयाच्या अनुषंगाने आज झालेली बैठक व चर्चेबाबत आपण शासनास कळविणार का? | सदर बैठकीचा वृत्तांत व रहिवाशंच्या मागण्यांबाबत पोलीस विभागाला अवगत करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १४ | पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांना शैक्षणिक वर्ष सुरु होण्याआधि म्हणजेच एप्रिल किंवा मे मध्ये पर्यायी ठिकाणी स्थलांतरीत करणे सोईचे होईल. | सदर मुद्याचा विचार करुनच स्थालांतराची वेळ निश्चित करण्यात येईल. |

बैठकीच्या शेवटी सर्व रहिवाशंनी प्रकल्पला त्यांचा पाठिंबा असून स्थलांतर करताना त्यांची गैरसोय होणार नाही व त्याबाबत त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेतले जातील अशी अपेक्षा व्यक्त केली त्यानंतर श्री सी. एम. जाधव जन. मॅनेजर (डेपो) यांनी बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल सर्व अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस वसाहतीतील पोलीस अधिकरी व अंमलदार तसेच त्यांचे कुटूंबीय यांचे त्यांच्या सहकार्याबद्दल आभार मानले. तसेच मेट्रो-३ प्रकल्पास यापुढेही असेच सहकार्य करण्याचे अवाहन केले.